सत्यमेव जयते

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.

९३, मल्हार पेठ, सातारा.

दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५

ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in

जा.क्र/जिवानिशा/वाहतूक अधिसुचना/४९१/२०२५ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - ३१/१०/२०२६

अधिसूचना

पाटण पोलीस ठाणे हद्दीत पाटण शहरात साळुंखे हायस्कूल, पाटण येथे दि. ०१/११/२०२६ रोजी जिल्हा मध्यवर्ती बँक, निवडणुक २०२६ अनुषंगाने मतदान केंद्र असून सदर ठिकाणी मतदान प्रक्रीया पार पडणार आहे. निवडणूक मतदान प्रक्रीये दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने साळुंखे हायस्कूल, पाटण कडे जाणारा पाटण शहरातील अंतर्गत मार्ग रामापूर चौक, पाटण ते रेस्ट हाऊस, पाटण हा वाहतूकीसाठी बंद होऊन पर्यायी मार्गाने वाहतूक वळविणे आवश्यक आहे. त्याबाबतची अधिसुचना प्रसिद्ध करणेत येत आहे.

मी निखील पिंगळे भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये पाटण शहरातील रामापुर चौक,पाटण ते रेस्ट हाऊस, पाटण या मार्गावरील वाहतूक मार्गात बदल करुन वाहतूक सुरळीत राहणेकरीता दि.०१/११/२०२६ चे ०७.०० ते १८.०० वा. पर्यतची खालील अधिसूचना पारित करीत आहे.

वाहतूक मार्गातील बदलाबाबत

वाहतूक मार्गातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

१. रामापूर चौक, पाटण येथुन रेस्ट हाऊस, पाटण कडे जाणारी सर्व प्रकारची वाहने ही रामापूर चौक - चाफोली चौक - गगनगिरी मठ येथुन रेस्ट हाऊस पाटण कडे जातील.

२. रेस्ट हाऊस पाटण येथुन रामापूर चौक पाटण कडे जाणारी सर्व प्रकारची वाहने ही रेस्ट हाऊस पाटण - गगनगिरी मठ - चाफोली चौक येथुन रामापूर चौकाकडे जातील.

३. रामापूर चौक, पाटण ते रेस्ट हाऊस, पाटण हा मार्ग सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली आहे.

तरी वरील वाहतूक ज्या ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतूक मार्गात केलेल्या बदलांबाबत सर्व नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसूचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दिनांक ३१/१०/२०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक सत्यमेव जयते सातारा

(निखील पिंगळे) भापोसे
पोलीस अधीक्षक सातारा

ठिकाण - सातारा

दिनांक - ३१/१०/२०२६

Scanned with OKEN Scanner

प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे

२/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.

२) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.

३) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत, तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार, पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी

४) मुख्य अभियंता सार्वजनीक बांधकाम विभाग सातारा

५) मुख्यधिकारी पाटण नगर परिषद पाटण

६) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.

७) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

<u>प्रत माहीतीसाठी सादर</u>

१) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.

२) मा.जिल्हाधिकारी सातारा.

Scanned with OKEN Scanner